**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात..**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/१०३/२०२४
दिनांक –०७.०३.२०२५

**प्रति,**

१. रघुनाथ सावळाराम साळूंखे
रा. शेळकेवाडी, ता.कमठेमहांकाळ जि.सांगली --------- **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. सविता गोपाल गडदे
२. तुकाराम नामदेव साळूंखे
३. चंद्रकांत नामदेव साळुंखे
४. द्रोपती नामदेव साळूंखे
५. सुजाता सुरेश गडदे
६. शोभा मारूती चव्हाण
७. सत्यभामा लक्ष्मण मोरे
८. मंगल जयसिंग शिंदे
९. ब्राळासाहेब अनंतराव घोरपडे
१०. शिवराज श्रीकांत जगताप
११. माणिक तुकाराम करे
१२. विलास तुकाराम करे

अ.क्र.१ रा. को.बोबलाद, ता.जत जि.सांगली
अ.क्र.२ ते ५ रा.शेळकेवाडी ता.कवठेमहांकाळ जि.सांगली
अ.क्र.६ रा.चिंचणी ता.तासगांव जि.सांगली
अ.क्र.७ रा.आदर्श व्यायामशाळा जवळ, भांडूप मुंबई
अ.क्र.८ रा.बनेवाडी ता.कवठेमहांकाळ जि.सांगली
अ.क्र.९ ते १२ रा.कोत्याबोबलाद ता.जत जि.सांगली ----- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे. को.बोबलाद, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ६५ या मिळकत प्रकरणी मंडळ अधिकारी तिकोंडी यांनी फेरफार नंबर ४१३४, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**अपिलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रीतसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

प्रकरणी अपिलार्थी यांना प्रस्तूत अपिलकामी नोटीस बजाऊन दिनांक ०२.०८.२०२४, ३०.०७.२०२४, २७.०८.२०२४, १७.१२.२०२४, १६.०१.२०२५ व ११.०२.२०२५ अन्वये म्हणणे मांडणे कामी वारंवार संधी देणेत आली आहे. तसेच दिनांक ०२.०८.२०२४, ३०.०७.२०२४,२७.०८.२०२४, १७.१२.२०२४ व १६.०१.२०२५ रोजी नोटीस बजावणीकामी आदेशीत करून आज अखेर अपिलार्थी यांनी जाबदार यांना नोटीस बजावणी केलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत अपील चालविणेकामी अपिलार्थी हे काही एक प्रयत्न करीत नसलेचे दिसून येत आहेत. त्यामुळे प्रस्तुतचे अपील अपिलार्थी यांना चालविणेचे स्वारस्य दिसून येत नसल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २३२ अन्वये प्रस्तुत प्रकरण कामकाजातून काढून टाकणे आवश्यक असलेचे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**प्रकरणी अपिलार्थी यांना प्रस्तुत अपील चालविणेत स्वारस्य दिसून येत नसल्याने प्रस्तुत प्रकरण कामकाजातून काढून टाकण्यात येत आहे.**

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण – जत
दिनांक – ०७.०३.२०२५

**प्रत—अपर तहसिलदार,संख यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.**